# वज्राघात

अथवा

## विजयनगरचा विनाशकाल !

**हरि नारायण आपटे**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**वज्राघात : हरि नारायण आपटे**

**© प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

मित्रवर्य प्रो. ना. स. पानसे, बी. ए.
यांस
छत्तीस वर्षांच्या एकतान स्नेहाचे
स्मारक म्हणून
हे पुस्तक अर्पण म्हणून केले आहे...

# दोन प्रास्ताविक शब्द

ऐतिहासिक कादंबरीचे आधारस्तंभ इतिहास व दंतकथा. या दोन स्तंभांच्या आधारावर ऐतिहासिक कादंबरी-मंदिराची रचना असते. आमच्या या कादंबरीला ऐतिहासिक आधार काय आहे तो Sewell साहेबांच्या A Forgotten Empire पुस्तकांत-विशेषत: या पुस्तकांतील प्रकरण १४ व १५ यांत वाचकांस सांपडेल. सोएलसाहेबांच्या विजयनगरच्या साम्राज्याच्या इतिहासात त्या साम्राज्याच्या अपकर्षांस व विध्वंसास काय कारणें झालीं त्याचें सविस्तर विवेचन आहे. त्या ऐतिहासिक आधाराला फेरिष्टाच्या दक्षिणच्या इतिहासांतील माहितीचा जोड दिला.

या कादंबरीत आलेल्या ऐतिहासिक भागाबद्दल हें झालें. परंतु विजयनगरच्या अपकर्षाला व विशेषत: तालीकोटच्या लढाईत त्या साम्राज्यावर जो भयंकर वज्राचा आघात झाला, त्याला अंत:स्थ कारणें काय होतीं तीं गोष्टीच्या रूपाने दाखविली आहेत. 'याला आधार काय ?' असा कोणी विचारील, तर त्यास उत्तर Briggs च्या फेरिष्टामधील एका टीपेंतील पुढील वाक्य होय.

"Caesar Frederick states, that the Hindoos lost the battle owing to the treachery of two Mahomedan Chiefs in Ramraja's army, a circumstance which Ferishta omits to mention :"

(Briggs Ferishta Volume III, page 130.)

सीझर फ्रेडेरिक म्हणतो, 'या लढाईत हिंदूचा पराजय होण्याला कारण रामराजाच्या सैन्यांतील दोन मुसलमान सरदारांची फितुरी होय. फेरिष्टा गोष्टीचें नांवहि काढीत नाहीं.

सीझर फ्रेडेरिक हा इतालिन प्रवासी इ. स. १५६७ सालीं म्हणजे विजयनगरच्या नाशानंतर दोन वर्षांनी त्या नगरीत गेला होता.

ही फितुरी कोणा सरदारानें केली याबद्दची दंतकथा या कादंबरीला मूलाधार होय. सुमारें पाचसहा वर्षांपूर्वी Hindostan Review नांवाच्या मासिकामध्यें ''विजयनगरचे साम्राज्य'' यावर एका मद्रासी गृहस्थांनीं एक लेख लिहिला होता, त्या लेखांत त्यांनी अशी दंतकथा दिली आहे :-

''रामराजाच्या तरुणपणी एका मुसलमान कुमारीवर प्रेम जडून तिच्या पोटीं त्याला एक मुलगा झाला. हा मुलगा घेऊन ती स्त्री कोठें परागंदा झाली. पुढें तो मुलगा तरुण झाल्यावर रामराजाच्या राज्यांत आला व त्याची मुलाखत घेऊन त्यानें रामराजाच्या पदरीं नोंकरी मागितली. त्यास पाहतांच हा आपलाच मुलगा असावा असें रामराजास वाटलें आणि नैसर्गिकपणेंच त्याच्यावर त्याचें प्रेम जडलें. त्यानें त्यास आपल्या शरीरसंरक्षक परिवारांत नोकरीस ठेविलें व त्याच्यावाचून त्यास करमेनासें झालें. रात्रंदिवस तो जवळ हवा असें त्यास वाटे.

पुढें एके दिवशी रामराजा दरबारांत बसला असतां त्याच्या लोकांनी एक मुसलमान सुंदरी त्याच्यापुढे आणून उभी केली. तिचा बुरखा काढून तिला उघडी करावी, असा हुकूम रामराजानें सोडला. रामराजाचें हें करणें अत्यंत गर्हणीय असें वाटून त्याचा त्या सरदाराने एकदम दरबारांत उठून रामराजाचा निषेध केला. तेव्हां ही सुंदरी या आपल्या मुलाला योग्य आहे असें वाटून रामराजानें ती त्या मुलाच्या स्वाधीन केली.

त्या सुंदरीने आपल्याला वरावें म्हणून तो मुसलमान तिची मनधरणी करूं लागला असतां तिनें त्याचा निषेध केला व म्हटलें :- 'ज्या हिंदुराजाने भर दरबारांत माझी इज्जत घेतली त्याचा व त्याच्या राज्याचा नायनाट झाल्याखेरीज मी कोणींशी लग्न करणार नाहीं. जो कोणी हें करील त्याला मी वरीन' ही तिची प्रतिज्ञा ऐकतांच त्या तरुण सरदारानें प्रतिज्ञा केली कीं, आपण हें काम करूं आणि तो त्या उद्योगास लागला. शेवट असा झाला की, त्यानें नानाप्रकारांनी फितुरी करून विजयनगरचा विध्वंस आणि रामराजाचा वध हीं साधलीं.

रणमस्तखान, मेहेरजान, नूरजहान वगैरे पात्रें या दंतकथेच्या अनुरोधानें कल्पून या कादंबरीत सजविलीं आहेत.

रामराजा ही ऐतिहासिक व्यक्ति. तालीकोटच्या लढाईच्या वेळीं रामराजाचें वय ९० वर्षांच्या वर होतें असें इतिहास-लेखक म्हणतात. मला ती अतिशोयक्ति

वाटून त्याचे वय मीं सुमारे ७०-७२ दाखविलें आहे. माझ्या या कथेचे ऐतिहासिक व आख्यायिक स्थूल आधार वर दिले आहेत. कल्पित कथानकांच्या समर्थनार्थ यापेक्षां अधिक आधार देण्याची व असण्याची आवश्यकता मला वाटत नाहीं.

सद्य:कालीन सामाजिक कादंबरीचे हृद्गत, पूर्वकालीन सत्य व सत्याभास यांचे मिश्रण होय. या मिश्रणांत सत्य किती अंश पाहिजे आणि सत्याभास किती अंश असावा म्हणजे कोणत्या रंगाची खुलावट होईल हें कारागिराच्या कौशल्यावर अवलंबून असणार. त्यानें बनविलेल्या त्या रंगाची खुलावट बरोबर झाली आहे कीं नाहीं, त्याची शहानिशा परीक्षक करणार. तेव्हां त्यासंबंधीचे विवेचन येथें नको. चित्र अमुक प्रसंगाचे आहे खरें, असें परीक्षकास वाटलें म्हणजे सत्याभासाच्या अंशाचे काम पुरें झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. चित्र म्हणजेच सत्याभास होय.

''वज्राघात'' हा हें विजयनगरच्या विनाशकालाचें चित्र होय.

**हरि नारायण आपटे**

# हरि नारायण आपटे यांचे
# अल्प चरित्र

दृष्टि समोर असलेल्या माणसाचें अंतरंग शोधणारी, ओष्ठ संभाषणासाठीं आतुर, मुखावर स्मिताची छटा, उंच आणि विस्तीर्ण भालप्रदेश, वाटोळा चेहरा आणि साधारण स्थूल–फार उंच नव्हे व ठेंगूहि नव्हे–अशी शरीरयष्टि, अशी कै. हरि नारायण आपटे यांची बाह्यरूपाकृति होती. प्रिय कन्येचा वियोग झाला त्या दिवसापासून त्यांच्या चर्येवरील स्मिताची छटा मावळली, आणि त्या ठिकाणीं विरक्तीनें पसरलेली गंभीरपणाची छाया दृग्गोचर होऊं लागली. जरा जोरानें त्यांच्या देहावर आपला पगडा बसवूं लागली, आणि पन्नाशीच्या घरांत पोंचण्यापूर्वीच ते पंचावन्न साठ वर्षांच्या वयाचे वृद्ध दिसूं लागले. यानंतर सातच वर्षे त्यांनीं इहलोकांत वास्तव्य केलें. १८६४ सालच्या मार्च महिन्याच्या आठव्या तारखेस त्यांच्या इहलोकवासास प्रारंभ झाला आणि तो १९१९ सालच्या मार्च महिन्याच्या तिसऱ्या तारखेस संपला. एकंदर पंचावन्न वर्षांत पांच दिवस कमी इतका काळ ते आमच्यामध्यें राहिले, आणि एवढ्या अर्धशतावधीच्या आयुष्यांत महाराष्ट्र–शारदेच्या भक्तमंडळींत फार मोठ्या मानाचें, फार मोठ्या कीर्तीचें व चिरस्मरणीय स्थान मिळवून ते गेले.

नारायण चिमणाजी ऊर्फ नानासाहेब आपटे यांचे हरि नारायण आपटे हे ज्येष्ठ पुत्र. बारशाच्या दिवशीं या मुलाचें नांव बाळकृष्ण असें ठेविलें होतें, पण कुटुंबांत दुसरा बाळकृष्ण आहे, असें आढळल्यावर तें नांव बदलून हरि हें दुसरें नांव ठेवण्यांत आलें. हरिभाऊंना मातृसुख फारसें लाभलें नाहीं. ते चार वर्षांचे असतांना त्यांची मातु:श्री इहलोक सोडून गेली. मातेच्या वियोगानंतर हरिभाऊंचें लालनपालन त्यांच्या चुलता–चुलतीकडून–महादेव चिमणाजी आपटे व त्यांच्या पत्नी सौ. पार्वतीबाई यांजकडून होऊं लागलें व या काका–काकींचा हरिभाऊंस फार लळा लागला.

हरिभाऊ जरा मोठें होतात न होतात तोंच काकींच्या मायेचें छत्रहि काळानें हिरावून नेलें. नानासाहेबांच्या मावशी–चिमामावशी–ह्यांनीं हरिभाऊंना काकींच्या मागून वाढविलें. हरिभाऊंचे वडील नानासाहेब हे सरकारी नोकर असून त्यांचे आचारविचार पक्क्या कर्मठ ब्राह्मणासारखे. चुलते महादेव चिमणाजी – हे पुढें नामांकित वकील झाले – यांचे आचारविचार पूर्णपणे सुधारक पंथाचे. हरिभाऊंचे बालपण यांच्याच सान्निध्यांत गेलें व या मातृविहिन मुलाचें कोडकौतुक त्यांनींच पुरविलें.

श्रीगणेशा शिकण्याचा आरंभ हरिभाऊंनीं मुंबईत केला, पण नानासाहेबांनीं आपलें बिऱ्हाड पुण्यास नेल्यावर हरिभाऊंस घेऊन ते पुण्यास गेले व तेथील हायस्कुलांत त्यांनी त्यांना घातलें. या वेळी हरिभाऊंचें वय चोदा वर्षांचें होतें. पुण्यांत त्यांना घरी संस्कृत शिकविण्यासाठीं शास्त्री ठेवण्यांत आला होता व त्याच्याजवळ हरिभाऊंनीं काव्यनाटकादिकांचा बराच अभ्यास केला. हरिभाऊ पुण्यास आल्यानंतर दोन वर्षांनीं न्यू इंग्लिश स्कूल ही नवीन शाळा निघाली व हरिभाऊ हायस्कूल सोडून या शाळेंत गेले, व याच शाळेंतून ते मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. यानंतर पुढील शिक्षणासाठीं ते डेक्कन कॉलेजांत गेले. न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींनीं फर्ग्युसन कॉलेज काढतांच डेक्कनमधून ते फर्ग्युसनमध्यें आले. या कॉलेजांत एक वर्ष घालवून पुन्हां ते डेक्कनमध्यें गेले. या दोन्ही कॉलेजांत मिळून सरासरी पांच वर्षे त्यांनीं काढलीं. हरिभाऊंचा ओढा व आसक्ति एका विषयाकडे, हरिभाऊंचा आणि गणिताचा तर छत्तिसाचा आंकडा! यामुळें हरिभाऊंची कॉलेजच्या परीक्षेंत प्रगति होऊं शकली नाहीं आणि अर्थात युनिव्हर्सिटीला आपली एखादी पदवी त्यांना अर्पण करतां आली नाहीं. पण त्यांच्या अंगच्या रसज्ञता व मर्मज्ञता या गुणांचें तेज शाळा व कॉलेज या दोन्ही ठिकाणच्या गुणज्ञ गुरुजनांच्या नजरेस आलें व त्यामुळें हरिभाऊ त्यांच्या कौतुक आदरास व प्रेमास पात्र झाले. त्यांना वाचनाचा छंद फार होता व त्या पायीं हजारों रुपये त्यांनी वेंचले. आपली वाचनाची तृष्णा तृप्त करण्यासाठीं ते फ्रेंच व जर्मन भाषा शिकले. कैक हजार ग्रंथ त्यांनीं सर्व भाषांतील मिळून वाचले आणि वाङ्मयप्रासादाच्या प्रत्येक दालनांत त्यांनीं प्रवेश केला.

हरिभाऊंचें जीवितकार्य त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या हेंच आहे. ह्या कादंबऱ्या त्यांनी जनमनोरंजनार्थ लिहिल्या नाहींत. त्या पतितांच्या उद्धारासाठीं, दीनांच्या दुःखविमोचनासाठीं, मार्गभ्रष्टांना सन्मार्गदर्शनासाठीं, हताश झालेल्या हृदयांत